# आझाद ठुबे यांना अटक





# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २७८, मंगळवार २३ जुलै २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये


# भ्रष्ट पोलिसांच्या तक्रारींचा पडला धो धो पाऊस!

## स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराविरोधात खा. नीलेश लंके यांचे उपोषण सुरू

नगर : प्रतिनिधी

**नगर जिल्हा पोलीस प्रशासनातील स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराविरोधात खा. नीलेश लंके यांनी सोमवारपासून पोलीस अधिक्षक कार्यालयापुढे सुरू केलेल्या उपोषणादरम्यान सामान्य नागरिकांडून पोलिसांविरोधात करण्यात आलेल्या तक्रारींचा अक्षरशः धो धो पाऊस पडला. दरम्यान, दिनेश आहेर यांची बदली तसेच अवैध व्यवसाय बंद झाल्याशिवाय माघार नाही अशी भूमिका खा. लंके यांनी माध्यमांशी बोलताना मांडली.**

तक्रारदारांच्या तक्रारी ऐकल्यानंतर माध्यमांशी बोलताना खा. लंके म्हणाले, आमच्याकडे आज लेखी स्वरूपात मोठया प्रमाणावर तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. नगर जिल्यात मोठया प्रमाणात अवैध धंदे वाढलेले आहेत. हप्तेखोरी चालू आहे. गुटख्याच्या गाडया सर्रास सोडल्या जातात. अनेक ट्रकचालकांना लुटले जाते. श्रीगोंदे तालुक्यात भोसले नामक पोलीस अधिकाऱ्याने मुस्लिम समाजाच्या घरात जाऊन गायीचा गोठा बंद करून त्यांची उपजिविका बंद केली. पोलीसांची धटींगशाही सुरू आहे. तक्रारी घेतल्या जात नाही. पोलीस अधिकारी, कर्मचारी पैसे गोळा करण्यात मश्गुल आहेत. मी ज्यावेळी लोकसभेची उमेदवारी केली त्यावेळी माझ्या फोन नंबरचे कॉल रेकॉर्डींग काढले. ही धक्कादायक माहीती उजेडात आली त्यावेळी पोलीस अधिक्षक तसेच गुन्हे शाखेची चलाखी उजेडात आली. पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांची तात्काळ बदली करावी त्यांच्याकडील अतिरिक्त कराभार काढून घेण्यात यावा, ही प्रमुख मागणी आहे. जोपर्यंत अवैध व्यवसाय बंद करण्यासंदर्भात ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहिल असा इशारा खा. लंके यांनी यावेळी दिला.

यावेळी अभिषेक कळमकर, विक्रम राठोड, किरण काळे, दिलीप सातपुते, भगवान फुलसौंदर, प्रकाश पोटे, बाबाजी तरटे, सुदाम पवार, सुवर्णा धाडगे, अ‍ॅड. राहुल झावरे, बाळासाहेब खिलारी, अभयसिंह नांगरे, चंद्रभान ठुबे, प्रा. संजय लाकूडझोडे, ज्ञानदेव लंके यांच्यासह अनेक कार्यकर्ते, तक्रारदार यावेळी उपस्थित होते.



■ स्थानिक गुन्हे शाखेतील भ्रष्टाचाराविरोधात खा. नीलेश लंके यांनी पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषणास प्रारंभ केला.

### आंदोनल दडपण्याचा प्रयत्न होऊ शकतो

हे आंदोलन दडपण्यासाठी साध्या वेशातील पोलीस कर्मचारी आंदोलनात सहभागी होऊन वाईट कृत्य केले जाउ शकते. पोलीस बळाचा वापर करू शकतात. त्यातून खोटे गुन्हे दाखल करण्याचाही प्रयत्न होईल त्यामुळे संपूर्ण आंदोलनादरम्यान माध्यम प्रतिनिधी तसेच कार्यकर्त्यांनी व्हिडीओ रेकॉर्डींग करण्याचे आवाहन खा. नीलेश लंके यांनी यावेळी केला.

### मंगळवारी पोलीस ठाण्यांसमोर उपोषण

खा. लंके यांच्या आंदोलनास पाठींबा देण्यासाठी मंगळवारी नगर लोकसभा मतदारसंघातील सर्व पोलीस ठाण्यांसमोर उपोषण करण्याचा इशारा महाविकास आघाडी तसेच नीलेश लंके प्रतिष्ठाणचे पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांच्या वतीने देण्यात आला आहे.

### तर नगरकर विखे यांना पुन्हा विजयी करतील

महाराष्ट्रात पहिल्या क्रमांकाची गुन्हेगारी नगर जिल्हयात आहे. बिंगो, बेटींग, मटका,जुगार खुलेआम सुरू आहे. बेटींगमध्ये पैसे गेल्याने अलिकडेच एका तरूणाचा बळी गेला आहे. त्याविरोधात तक्रार केल्यानंतर आरोपींना पोलीसांकडून संरक्षण दिले जाते. मृत व्यक्तीच्या जमीनीची विक्री करण्याच्या घटनाही घडत आहेत. मा. खा. डॉ. सुजय विखे यांनी शहरातील ताबेमारीविरोधात न्यायालायात दादा मागावी, नगरकर त्यांना पुन्हा विजयी करतील.

योगीराज गाडे, मा. नगरसेवक

### सुवर्णकारांना जाच

एका गुन्हयातील मुद्देमाल दहावेळा वसुल केला जातो. सुवर्णकारांना अनधिकृत लॉक अप मध्ये बसवून दहशत निर्माण केली जाते. पोलीस लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांचेही कॉल ट्रॅकिंग करतात. त्यामुळे या विभागाकडे तक्रार करूनही उपयोग होत नाही. अशा पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांवर मोक्कांतर्गत कारवाई झाली पाहिजे. अनिल राठोड यांच्यानंतर खा. नीलेश लंके यांनी सुवर्णकार बांधवांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठविला आहे.

श्री लाळगे, अध्यक्ष सुवर्णकार संघटना

### चोरीच्या सोन्याचा आरोप आणि अडीच लाखांची वसुली

चोरीचे सोने घेतल्याचा खोटा आरोप करून माझ्या पतीला मारहाण करीत पोलीस अधिक्षक कार्यालयात आणण्यात आले. तिथे उपस्थित असलेल्या उपनिरीक्षकाने दालनात जाऊन सेटलमेंट करून घेण्याचा सल्ला दिला. त्यास नकार दिल्याने माझ्या पतीला बेदम मारहाण करण्यात आली. अडीच लाख रूपयांचे सोने आणून दिल्याशिवाय माझ्या पतीची सुटका करण्यात आली नाही. खोटा आरोप लावून माझ्या पतीस मारहाण करण्यात आली. दबाव टाकून आमच्याकडून सोने घेतले त्यासाठी अडीच लाख रूपये व्याजाने घ्यावे लागले. हे पैसे पोलीसांनी व्याजासह परत द्यावेत. अधिकारी आहेर, कर्मचारी कर्डीले यांनी या प्रकरणात त्रास दिला.

प्रियंका गायकवाड, तक्रारदार

### इतर लोकप्रनिधींनी आवाज का उठविला नाही ?

खा. लंके हे देशातील एकमेव लोकप्रतिनिधी असे आहेत की त्यांनी पोलीस प्रशासनातील भ्रष्ट कारभाराविरोधात आवाज उठविला आहे. सामान्य जनतेला पोलींकडून जाच होत असताना अवघ्या दिड महिन्यात खा. लंके यांनी भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठविला आहे. नगर शहरातील ताबेमारीमध्ये ठराविक पोलीस अधिकारी सहभागी आहेत. पोलीस प्रशासनातील भ्रष्टाचाराविरोधात इतर लोकप्रतिनीधींनी आजवर का आवाज उठविला नाही ? कारण मलई खाण्यात ते देखील सहभागी आहेत.

अभिषेक कळमकर
मा. महापौर

### लुटारूंवर गुन्हे दखल झाल्याशिवाय माघार नाही : खा. लंके यांचा इशारा

चोरीस गेलेल्या सोन्याची रिकव्हरी करण्याचे खोटे कारण पुढे करून सुवर्णकारांचे कोट्यावधी रूपये लुटणाऱ्या अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल करा अन्यथा माघार नाही असा इशारा निलेश लंके यांनी सायंकाळी अनेक सुवर्णकार व त्यांच्या कुटुंबीयांनी भेट घेऊन त्यांच्या कुटुबियांची झालेली वाताहत कथन केल्यानंतर दिला. वेळप्रसंगी मला जेलमध्ये बसावे लागले तरी चालेल परंतु या लुटारूंना मी सोडणार नाही असा इशाराही खा. लंके यांनी दिला.

### लंके यांचा प्रचार नको म्हणून धमक्या

लोकसभा निवडणूकीदरम्यान आम्हाला फिरायला जा, खा. लंके यांच्या प्रचारात सहभागी होऊ नका, तुम्हाला मोक्का लावू, तडीपारी करू अशा धमक्या देण्यात येत होत्या. मात्र आम्ही न डगमगता खा. लंके यांच्या प्रचारात सहभागी झालो.

दिलीप सातपुते

### अ‍ॅड. गर्जे यांनी वाचला कृष्ण कृत्यांचा पाढा

तपास थांबविण्यासाठी महिलेकडे शरीर सुखाची मागणी करणारे कर्मचारी स्थानिक गुन्हे शाखेत आहेत. स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचाऱ्यांनी कोणत्याही पोलीस ठाण्याच्या हद्दीत गेल्यानंतर सबंधित स्टेशन डायरीला नोंद करणे बंधनकारक असते. मात्र तसे न करता खुले आम हप्ते वसुली करण्यात येते. रस्ते आडवून पैसे उकळले जातात. नगर जिल्हयासाठी कोण एसपी हवा याचा ठेका कर्डीले नावाचा कर्मचारी याने घेतला आहे. एस पी आपल्या शब्दापुढे नाही अशी भाषा हा कर्डीले कर्मचारी वापरतो. कोणत्याही पोलीस कार्यालयात सीसीटीव्ही असणे बंधकारक असताना स्थानिक गुन्हे शाखेच्या कार्यालयात मात्र सीसीटीव्ही नाहीत. या शाखेकडून न्यायालयाच्या आदेशाचा भंग करण्यात येत असून त्या विरोधात आपण याचिका दाखल करणार आहोत. या शाखेतील ठरावीक कर्मचा-यांना पिस्टल देण्यात आले असून ते कोणाच्या परवानगीने देण्यात आले याचा खुलासा झाला पाहिजे. हे कर्मचारी हे पिस्टल त्यांच्या घरीही घेऊन जातात. या शाखेचे कर्मचारी कोणाच्याही मोबाईल फोनचे सीडीआर काढतात. राईट टू प्रायव्हसी नुसार असे करता येत नाही. हप्ते वसुल करणारे कर्मचारी सात ते आठ वर्षांपासून एकाच पोलीस ठाण्यात आहेत.

अ‍ॅड. हरीहर गर्जे, पाथर्डी

### मुख्यंत्र्यांचे लक्ष वेधल्यावर कारवाई

हेरंब कुलकर्णी सारख्या सामाजिक कार्यकर्त्यावर हल्ला होतो. तोफखाना पोलीस ठाण्यात त्यांचा गुन्हा दाखल करून घेण्यात येत नाही. खा. सुप्रिया सुळे यांनी मुख्यमंत्रयांचे लक्ष वेधल्यानंतर पोलीस कारवाई करतात यावरून अवैघ व्यवसायांना पोलीसांकडून कसे अभय मिळते हे लक्षात येते.

किरण काळे

### ५ गुंठे जागेवर ताबा

आपल्या प्रोफेसर कॉलनीमधील ५ गुंठे जागेवर ताबा मारण्यात आला. त्याविरोधात आवाज उठविल्यानंतर आपणावर दादागिरी करून मारहाण करण्यात आली. पोलीसांकडून न्याय मिळत नाही. खा. नीलेश लंके यांनी मला माझ्या जागेचा ताबा मिळवून द्यावा.

उषारजनी लोंढे

# दादांच्या मेळाव्यासाठी बचत गटाच्या महिला, अंगणवाडी सेविका!

■ लाडकी बहिण योजनेसाठीच्या मेळाव्याचा फज्जा
■ अजित पवारांचा पारनेर तालुक्यातील सर्वात छोटा मेळावा

पारनेर : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या योजनेच्या जनजागृतीसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री धनंजय मुंडे मंत्री आदिती तटकरे, रूपाली चाकणकर यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या मेळाव्यासाठी बचत गटाच्या महिला तसेच अंगणवाडी सेविकांना पाचारण करण्याची वेळ संयोजकांवर आली. त्यामुळे या मेळाव्याचा फज्जा उडाल्याचे पहावयास मिळाले. अजित पवार यांचा पारनेर तालुक्यात पार पडलेला हा सर्वात छोटा मेळावा ठरला.**




दोन दिवसांपूर्वी मेळाव्याचे नियोजन झाल्यानंतर प्रशांत गायकवाड यांनी जिल्हा बँकेत आढावा बैठक घेतली. या बैठकीस जिल्हयातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारीही उपस्थित होते. या बैठकीदरम्यान प्रशांत गायकवाड यांनी जिल्हा बँकेचे तालुका विकास अधिकारी प्रभाकर लाळगे यांना अपमानास्पद वागणूक दिल्याने त्यांच्यात तु तू मै मै झाली. त्याचा व्हिडीओ व्हायरल होऊन त्याची चर्चा जिल्हाभर झाली. याच बैठकीत जिल्हा बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांना प्रत्येकी १०० महिलांना घेऊन येण्याचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्येही नाराजी होतीच. पक्षाचा नव्हे तर आपल्या बँकेचा कार्यक्रम समजून महिलांना उपस्थित राहण्यासाठी परीश्रम घ्या अशी तंबीही प्रशांत गायकवाड यांनी दिली होती. नियोजनाच्या बैठकीलाच गालबोट लागल्याने सोमवारी पार पडणाऱ्या मेळाव्याविषयी शंका, कुशंका घेण्यात येत होत्या.

सकाळी साडेनऊ वाजता कार्यक्रमाची वेळ होती, मात्र तोपर्यंत अगदीच ५०-१०० महिला उपस्थित असल्याने कार्यक्रमासाठी वेळेवर उपस्थित राहिलेल्या मंत्री आदिती तटकरे, रूपाली चाकणकर यांना ताटकळत बसावे लागले. गर्दी होत नसल्याने अजित पवार हे देखिल ११ नंतर मेळाव्याठिकाणी पोहचले. त्यावेळही कसे बसे मंगल कार्यालय भरविण्यात संयोगकांना यश आले होते. मेळाव्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरच भाजपाचे पुरूष पदाधिकारी तसेच कार्यकर्तेही उपस्थित राहिल्याचे मेळाव्याची शोभा वाढली.

### गायकवाडांच्या मनसुब्यांवर पाणी

मोठया संख्येने महिला उपस्थित राहून मेळावा यशस्वी होईल या आशेने प्रशांत गायकवाड यांनी पारनेर शहरात मोठया प्रमाणावर फलक लावले होते. नगरकडे जाताना अजित पवार यांचे लक्ष वेधले जाईल असे मोठ मोठे व्होर्डींग्जही त्यांनी लाखो रूपये खर्चून लावले मात्र मेळाव्याचा फज्जा झाल्याने आजकाल दादांची स्टाईल मारणारे प्रशांत दादा अजितदादांच्या आसपासही फिरकले नाहीत.

### महिलांसाठी ५०० रूपये !

या मेळाव्यासाठी आणण्यात आलेल्या काही महिलांना गाडीतून उतरल्यानंतर प्रत्येकी ५०० रूपये देण्यात आले. त्याचे व्हिडीओही व्हायरल झाले आहेत. एरव्ही पवारांचा कार्यक्रम असेल तर उर्स्फुतपणे गर्दी होत असताना राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजितदादांसाठी गर्दी गोळा करताना संयोजकांच्या नाकी नऊ आले.

### दादांसाठी भरलं घर सुनं सुनं ।

नेहमीच पारनेर दौऱ्यावर आल्यानंतर मोठा उत्साह पहावयास मिळत असताना सोमवारच्या मेळाव्यासाठी पारनेर दौऱ्यावर आल्यानंतर अजित पवारांना पूर्वीसारखा उत्साह दिसून आला नाही. मेळाव्यासाठी गर्दी जमवावी लागल्याने दादांनी नाराजीही व्यक्त केली. नेहमी भरलेलं असलेलं घर दादांसाठी सुनं सुनं वाटत होतं !

# आझाद ठुबे यांना अटक

## कर्जदाराची फसवणूक केल्याप्रकरणी झाला होता गुन्हा दाखल

पारनेर : प्रतिनिधी

**संगनमताने अवैध सावकारी करून कर्जदारांनी कर्ज प्रकरणात सादर केलेल्या कागदपत्रांचा वापर करून फसवणूक केल्याप्रकरणी राजे शिवाजी पतसंस्थेचे चेअरमन, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य आझाद ठुबे यांना पारनेर पोलीसांनी रविवारी रात्री अटक केली. ठुबे यांना सोमवारी पारनेरच्या न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता त्यांना न्यायालयाने २५ जुलै पर्यंत पोलीस कोठडी दिली.**



यासंदर्भात सहकार अधिकारी तात्यासाहेब भोसले यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार आझाद ठुबे यांच्यासह रणजित पाचारणे शिरूर, पोपट म्हस्के हंगा, तसेच पतसंस्थेचा मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी भालेकर यांच्याविरोधात पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर आझाद व इतर आरोपी पसार झाले होते. पोलीस त्यांच्या मागावर


उर्वरीत पान ३ वर











फॅशन | संसार | सौंदर्य
# सखी

दागिन्यांचा विषय निघाला की चर्चेचा मोर्चा सहजच इतर देशांकडे वळतो. दरवर्षी कपडे, ॲक्सेसरीज यांच्यासोबत दागिन्यांचे ट्रेण्डसुद्धा जगभरात बदलत असतात. यंदाच्या जगभरातील दागिन्यांच्या ट्रेण्डवर एक नजर....



## भारताबाहेरचे ट्रेण्ड्स!

### स्टेटमेंट इअररिंग्स

गेल्या काही वर्षांपासून नेकपीसला जास्त महत्त्व दिलं गेलं होतं. आता मात्र फोकस इअररिंग्सवर आहे. मोठाले, लांब कानातले डूल यंदा आवर्जून पाहायला मिळतील. प्लास्टिक, थ्रीडी तंत्रज्ञान यामुळे दागिन्यांचं वजन काही प्रमाणात कमी झालं आहे. त्याचा परिणाम म्हणून ओव्हरसाइज कानातले यंदा न्यूयॉर्क आणि पॅरिसच्या रनवेवर पाहायला मिळाले. अर्थात यांच्यासोबतच मोती, रंगीत खडे, सोने, हिरे यांचा वापरही इअररिंग्समध्ये आवर्जून करण्यात आला होता. इअररिंग्समधील यंदाचा महत्त्वाचा बदल म्हणजे दोन्ही कानांतील समान इअरिरग्सना फाटा देत एकाच कानात इअररिंग घालायची किंवा दोन्ही कानात वेगवेगळे इअररिंग्स घालायची पद्धत यंदा रुजू झाली आहे. आपल्याकडे मागच्या वर्षी इअरकफचा ट्रेण्ड आला होता. एका किंवा दोन्ही कानांमध्ये संपूर्ण कानाच्या आकाराचं, नजरेत भरणारं इअरकफ घातलं जायचं. पण तेव्हा दुसऱ्या कानामध्ये छोटा खडा घातला जायचा. पण यंदा मात्र इअरकफसोबत दुसरा कान मोकळा सोडला जातोय. तसचं इअरकफचा आकारही वाढला आहे. सध्या दैनंदिन वापरातचं नाही तर पार्टी, समारंभाला जातानासुद्धा वेगवेगळे दागिने घालण्याऐवजी एकच नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे तरुणाई पसंती देत आहे. हे दागिन्यांचा आकार वाढण्याचं मुख्य कारण आहे. याचबरोबर तुम्हाला दोन्ही कानांत डूल घालायचेच असतील तर दोन वेगवेगळे डूल घालायचा प्रयोगही यंदा केला गेलाय. तुमच्या ड्रेसमधील दोन मुख्य रंग निवडून (कॉन्ट्रास असतील तर उत्तम) त्या रंगाचे कानातले यात घातले जातात. यामध्ये दोन्ही कानांतल्यांचा आकार वेगळा असेल तरी चालू शकतं. पण सुरुवातीला प्रयोग करताना किमान एक घटक समान असू द्या. उदा. मूळ चौकोनी आकाराचे कानातले निवडून दोघांचे आकार छोटे-मोठे असू द्या. दोन्ही कानांतल्यांचा बेस रंग समान असू द्या. तसेच एक कुंदन आणि एक हिऱ्याचं डूल असं एकदम टोकाचे कानातले निवडून चालणार नाही. शक्यतो दोन्ही कानातले मोठे, केसांमध्ये न लपता पटकन नजरेत येणारे असू द्या. तुम्हाला पारंपरिक इअररिंग्स पसंत असतील तर कानाच्या आकारापेक्षा मोठे आणि भौमितिक आकारांचे इअररिंग्स वापरता येतील.

### पारंपरिक मोटिफ्स आणि मोती

दागिन्यांमध्ये नक्षीकाम आणि मोटिफ्स कोणते वापरतो, याला अधिक महत्त्व आहे. पेइली, फ्लोरल, मीनाकारी, भौमितिक, प्राणी-पक्ष्यांचे आकार असे कित्येक मोटिफ्स दागिन्यांमध्ये वापरले जातात. यंदा नवीन चिन्हे निवडण्याऐवजी पारंपरिक चिन्हांना डिझायनर्सनी पसंती दिली आहे. यामध्ये कित्येक धार्मिक चिन्हांचा, पुरातन वास्तूमधील चिन्हांचा प्रामुख्याने समावेश आहे. ख्रिश्चनांचा क्रॉस, इजिप्त, ग्रीक संस्कृतीतील चिन्हे, प्राण्यांचा आकार यांचा समावेश केला गेलाय. फ्लोरल आकारांवरसुद्धा ग्रीक, पर्शियन शिल्पकलेचा प्रभाव आवर्जून पाहायला मिळतो. यंदाच्या दागिन्यांमध्ये प्रामुख्याने नजरेत येणारा घटक म्हणजे मोती. मोठाले, शक्यतो सफेद मोती यंदा कित्येक डिझायनर्सनी दागिन्यांमध्ये वापरले आहेत. हिरे आणि इतर धातूंच्या तुलनेत मोत्यांचे दागिने कपडय़ांच्या वेगवेगळ्या रंगांवर खुलून दिसतात. तसेच पारंपरिक, फॉर्मल, पार्टीवेअर सगळ्याच लुकवर ते वापरता येतात. त्यामुळे मोत्यांचा वापर यंदा दागिन्यांमध्ये केला गेलाय. सफेद आणि क्रीम रंगाच्या मोतींसोबत रंगीत मोतीही यंदा वापरले गेले आहेत. यांच्यासोबतच रंगीत मिनरल्सचा वापरसुद्धा पेण्डंटमध्ये केला गेलाय. सोने, चांदी, प्लॅटिनम या खऱ्या धांतूऐवजी प्लास्टिक, सोन्याचांदीचं पाणी चढवलेले धातू, लेदर, कापड यांचा वापरही दागिन्यांमध्ये केला गेलाय.

### चोकर आणि नाजूक नेकपीस

यंदा इअररिंग्सवर अधिक लक्ष दिलं गेल्याने नेकपीस सिंपल ठेवण्याकडे बऱ्याच डिझायनर्सनी पसंती दिली आहे. विशेषतः ९०च्या दशकातील गळ्याभोवती घट्ट बसणारा चोकर पुन्हा पाहायला मिळतो आहे. पण यंदा त्याचं रूपं विस्तारलं आहे. पारंपरिक लेदर किंवा प्लास्टिकच्या पट्ट्याच्या चोकरसोबत धातू, मणी यांचा वापर करून केलेले मोठाले चोकरसुद्धा लक्ष वेधून घेत आहेत. तुम्हाला गळाबंद चोकर नको असेल तर नाजूक पेण्डण्ट किंवा नेकपीसचा पर्यायसुद्धा डिझायनर्सनी दिला आहे. मध्यम आकाराच्या खड्यांची नाजूक माळ किंवा नाजूक सरीसोबत मोठाले पेण्डण्ट हे प्रकार यंदा आवर्जून पाहायला मिळतील. अर्थात हे पेण्डण्टसुद्धा इअररिंग्सप्रमाणेच आकाराने मोठे आहेत. कानातून गळ्याभोवती जाणारा नेकपीस, स्कार्फप्रमाणे गळयामागून येत समोर मोकळा सोडलेला नेकपीस असे कित्येक प्रयोग डिझायनर्सनी यंदा केले आहेत.

### आर्मकफ आणि अंगठ्या

मघाशी म्हटल्याप्रमाणे अंगभर दागिने घालण्यापेक्षा एक नजरेत भरणारा दागिना घालण्याकडे डिझायनर्सचा यंदा कल आहे. त्यातीलच एक प्रकार म्हणजे आर्मकफ. थोडक्यात सांगायचं झाल्यास अंगठी आणि कड्याला जोडणाऱ्या हातफुलाचं उदाहरण घेता येईल. पण इअररिंग्सप्रमाणेच या आर्मकफचा आकार मोठा आहे. फ्लोरल आकारांसोबत दोरीची नॉट, वेल, भौमितिक आकार या विविध आकारांचा वापर यात केला आहे. यावर्षी खडे, मोती, माणिक यांच्या मोठय़ाला अंगठय़ासुद्धा नक्की पाहायला मिळतील. पण हल्ली एकच अंगठी घालून भागत नाही. सगळ्या बोटांमध्ये वेगवेगळ्या आकाराच्या अंगठ्या घालायची पद्धत आता रुजू झाली आहे. अगदी एकाच बोटात दोन-तीन अंगठ्याही घातल्या जातात. त्यानुसार नाजूक अंगठ्याही पाहायला मिळतात. काही वर्षांपूर्वीपर्यंत परदेशातील हे ट्रेण्ड्स भारतात येईपर्यंत दोन-तीन वर्षे जायची. पण हल्ली मात्र जागतिक ट्रेण्ड्स भारतात लगेचच पाहायला मिळतात. त्यामुळे हे ट्रेण्ड्स न्यूयॉर्क, पॅरिसमध्ये दिसून आले असले, तरी भारतातसुद्धा त्यांची चाहूल लागलेली आहे.



दागिन्यांचं खरं सौंदर्य पारंपरिक रूपात दिसून येत असलं तरी आता काळानुरूप दागिन्यांमध्येही बदल होताना दिसताहेत. आधुनिक पद्धतीचे, पण पारंपरिक वलय असलेले विविध स्वरूपातील दागिने तरुणींसाठी पर्वणी ठरत आहेत...

# बहुढंगी लखलखते दागिने...

ट्रेनमध्ये हँगरवर लटकवलेले कानातले डूल, पैंजण, कडे असोत किंवा फॅशन स्ट्रीटवरच्या दुकानात मोलभाव करून घेतलेले स्टेटमेंट नेकपीस, डिझायनरचं खास हटके कलेक्शन असो किंवा सोन्याच्या दुकानात डोळे दिपवून टाकणारे दागिने... स्वरूप काहीही असो दागिने स्त्रीच्या मनाला भुरळ घालणार नाहीत, असं होणं शक्य नाही. कपडे आणि दागिन्यांची हौस फिटत नाही असं म्हणतात ते उगाच नाही. पण, तरीही दागिन्यांवरचं तिचं प्रेम किंचित जास्त असतं. त्याला कारणच तसं असतं म्हणा ना. एखादं दिवशी काहीच पर्याय नाही म्हणून जुना, साधासा टॉप घालावा लागला, तर त्यासोबत छानसं कानातलं घातलं की दिवस मस्त जातो, मैत्रिणीला वाढदिवसाला गिफ्ट देताना कपड्यांच्या साईझवरून गोंधळ होऊ शकतो पण, नेकपीस, कड्याबद्दल हा गोंधळ कधीच होऊ शकत नाही. जुने कपडे काळानुसार उसवले जातात, तोकडे पडतात पण, दागिने तुमची साथ क्वचित प्रसंगीच सोडतात. दागिन्यांचं महत्त्व कवींनाही पटलं आहे. त्यामुळेच तर त्यांनी झुमक्यापासून नथनीपर्यंत, बांगड्यांपासून पैंजणांपर्यंत कित्येक दागिन्यांवर कविता-गाणी करून ठेवली आहेत, नाही का..!

आजची तरुणीसुद्धा कितीही मॉडर्न झाली असली तरी तिची दागिन्यांची आवड काही संपली नाही. त्यामुळेच तर आज तिच्यासाठी तिच्या मागणीनुसार दागिन्यांची एक मोठी बाजारपेठ उभी ठाकली आहे. त्यात पारंपरिकतेपासून आधुनिक पद्धतीच्या दागिन्यांपर्यंत, सोन्यापासून जडाऊ, हिरे कुंदनपर्यंत अनेक पर्याय तिच्यासमोर आहेत. अगदी आता-आतापर्यंत केवळ लग्न ठरल्यावर सोन्याच्या दुकानात पाय ठेवणारी तरुणी पहिला पगार, प्रमोशन, तर कधी सहज मनाला आलं म्हणून हिरे, सोन्याचे दागिने खरेदी करू लागली आहे. पण, म्हणूनच हे दागिने कडीकुलपात बंद करून फक्त सणांच्या वेळी काढण्याऐवजी रोज ऑफिस, पार्टी, गेटटूगेदरमध्ये मिरवणे ती अधिक पसंत करते. नवीन इंटर्न म्हणून ऑफिसला रुजू झाल्यावर फॅशन स्ट्रीटवर तिने केलेल्या बार्गेनचे किस्से रंगवणारी ती दोन-एक वर्षांत किती कॅरेटचा हिरा किती लकाकतो याच्या गप्पा रंगवायला लागते. तेव्हा तिच्यासोबत तिचे दागिनेसुद्धा कात टाकू लागले आहेत हे लक्षात यायला लागतं...

### इमिटेशन ज्वेलरीचा प्रभाव



तरुणींवर असलेला इमिटेशन किंवा फॅशन ज्वेलरीचा प्रभाव नाकारता येणार नाही. त्यामुळे सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीमध्ये इमिटेशन ज्वेलरीमधील मोटिफ, डिझाइन वापरलं जाऊ लागलं आहे. इमिटेशन ज्वेलरीच्या स्टाइलचे हत्ती, वाघ, सिंह असे विविध मोटिफ, झुंबराकृती, एसिमेट्रिकल आकार, पठडीच्या रंगांपेक्षा वेगळे रंग असे अनेक गुण पारंपरिक सोन्याच्या आणि हिऱ्याच्या जडणघडणीत वापरत येत आहेत. हत्तीच्या छबी वापरून अंगठ्या, पेंडेंट्स हल्ली अनेक ज्वेलर्सकडून बाजारात आणली जात आहेत.

### अंगठ्यांना पहिली पसंती

कित्येकदा तरुणी त्यांच्या साठवलेल्या पैशातून अंगठी घेण्यास पसंती देतात. तसंच हल्ली लग्नानंतर मंगळसूत्र रोज वापरण्यापेक्षा सणाच्या किंवा कार्यक्रमाच्या दिवशी कपाटाबाहेर काढलं जातं. त्याऐवजी तरुणी साखरपुड्याची अंगठी घालण्यास पसंती देतात. त्यामुळे अशा वेळी आपली अंगठी सुंदर आणि चारचौघांत उठून दिसावी याकडे भर दिला जातो. म्हणून गेल्या दोन वर्षांत अंगठय़ांच्या डिझाइन्समध्ये भरपूर विविधता पाहायला मिळाली. यामध्ये अंगठीचा रंग, आकार, साइज यामध्ये प्रयोग करण्यात आले. सध्या थ्रीडी स्टाइल आणि दोन बोटांत घालायच्या अंगठीला पसंती मिळत आहे. प्लॅटिनमच्या अंगठ्या तर साखरपुड्यासाठी पहिली पसंती असते.

### डिटॅचेबल ज्वेलरी

बाजारात 'मल्टी युझ' ज्वेलरी, 'डिटॅचेबल ज्वेलरी' अशा विविध नावांनी या दागिन्यांना संबोधले जाते. मध्यंतरी दागिन्यांच्या जाहिरातींमध्ये मॉडेलच्या केसांची छानपैकी हेअरस्टाइल करून त्यात हिरे, जडाऊचे हार खोवले जायचे. जेणेकरून हाराला हेडपीसचा लुक येत असे. खास समारंभाला आवर्जून पार्लरला जाऊन तयार होणाऱ्या तरुणी हाराचा असा वापर नक्कीच करून पाहतात. यामुळे ड्रेसचा गळा हारामुळे लपला न जाता फोकसमध्ये येतो. लुकला नवेपणाही मिळतो.


### सोन्यातही मिक्स मॅच

पूर्वी सोन्याचा हार घेताना कानातले डूल त्यासोबतच यायचे. बांगड्याही हाराला साजेशा घेतल्या जायच्या. जेणेकरून दागिन्यांचा 'सेट' बनत असे. पण हल्ली वेगवेगळ्या सेटमधील दागिने मिक्स मॅच करून घालण्याचा ट्रेंड सोन्याच्या दागिन्यांमध्येसुद्धा रुजू होत आहे. 'तरुणी हल्ली कानातले डूल, हार, बांगडय़ा असं वेगवेगळं डिझाइन आणि गरजेनुसार वेगवेगळं खरेदी करतात. मग समारंभानुसार एक किंवा अनेक दागिने घातले जातात. यामुळे त्यांना निवडक दागिन्यांतही पर्याय मिळतो. सणाच्या दिवशी साडी ते पार्टीसाठी गाऊनपर्यंत आजची तरुणी प्रसंगानुसार कपड्यांची निवड करते. त्यामुळे साडीसोबत खुलणारे कानातले हिऱ्याचे डूल गाऊनसोबत पण उठून दिसतील, याची काळजी ती खरेदी करताना घेते.

### फुलाफुलांची मोहक दुनिया...

- कोणताही कपडा नजरेत भरला की त्यावर फुलांची डिझाईन आहे का याची लगेचच विचारणा होते. विविध रंग आणि आकारांच्या देखण्या डिझाईन्स लक्ष वेधून घेतात. फ्लोरल म्हणजेच फुलांच्या डिझाईन्स, पॅटर्न्सना दागिने आणि कपड्यांमधून कधीच मरण नव्हते. पण, यंदाच्या सीझनमध्ये स्त्रियांचे फुलांवरचे प्रेम किंचित जास्तच झालंय. त्यामुळे रॅम्पवर कपडे आणि दागिन्यांमधील फ्लोरल डिझाईन्स हा यंदाचा सर्वात मोठा ट्रेंड आहे. फुलाफुलांची मोहक दुनिया आता ज्वेलरीमध्येही बघायला मिळेल.
- 'फ्लोरल आणि टेम्पल डिझाईन्स या दागिन्यांच्या बाबतीत एव्हरग्रीन असतात यात वाद नाही. पण, यंदा फ्लोरल डिझाईन्सचा झालेला वापर थक्क करणारा आहे. हे प्रमाण इतकं वाढलं की, 'फ्लोरल ज्वेलरी' नावाची नवी संज्ञा जन्माला आली. यात फुलांचे डिझाईन असलेले नेकलेस, कानातले डूल, बांगड्या असे पारंपरिक प्रकार तर आहेतच. पण, हातफूल, चोटी (केसांच्या वेणीवरचा हेडपीस) यांसारखे वापरातून मागे पडलेले जुने दागिन्यांचे प्रकार परत आले आहेत.
- कित्येक बड्या बॉलीवूड सेलेब्रिटीजनी या फ्लोरल ज्वेलरी मिरवल्या आहेत. या फ्लोरल डिझाईनला अजूनच खुलवण्याचं काम केलं आहे ते दागिन्यांना दिल्या जाणाऱ्या अनेक पदरी डिझाईनने. मागच्या वर्षीपासून थ्रीडी डिझाईन्सचा ट्रेंड दागिन्यांमध्ये रुजू झाला आहे. यामुळे दागिन्यातील फुलांमधील प्रत्येक पाकळी उलगडलेली आणि त्यातील बारीक नक्षीकाम पाहायला मिळतं. पार्टीसाठी असं फुलाचं डिझाईन असलेलं एखादं ओव्हरसाईझ कानातलं सहज घालता येतं. ते छान इंडो-वेस्टर्न, क्लासी लुक देतं. सणासमारंभाला त्यासोबत एखादा नेकपीस किंवा कडे घालून पारंपरिक लुकही मिळू शकतो. याखेरीज यंदा सिम्पल आणि सुटसुटीत डिझाईन्सवर जास्त भर दिला गेला आहे. दागिन्यांतील मुख्य मोटीफ किंवा खडा फोकसमध्ये येईल याची काळजी डिझायनर्स घेऊ लागले आहेत. त्यामुळे दागिन्यांना उठाव मिळतोच, पण बदलत्या काळानुसार डिझाईन जुनी वाटत नाही.

### एकच दागिना, वापर वेगवेगळ्या पद्धतीने...




फॅशन इंडस्ट्रीमध्ये असंख्य प्रयोग होत असतात. त्याचा अनुभव घेता येतो तो फॅशन स्ट्रीट किंवा तत्सम शॉपिंगसाठी असलेल्या लोकप्रिय ठिकाणी. हे प्रयोग बघून तरुण मुली घरच्या घरीसुद्धा त्याचं अनुकरण करतात. केवळ कपड्यांच्या बाबतीतच हे अनुकरण न करता आता त्यांनी मोर्चा वळवलाय तो ज्वेलरीकडे. कपड्यांमध्ये जसं एकच स्टोल किंवा स्कार्फ वेगवेगळ्या पद्धतीने घेतला जाऊ शकतो तसं दागिन्यांमध्ये करता येतं, याचं प्रात्याक्षिक तरुण मुली करत असतात. याचा अंदाज घेऊनच डिझायनर्सनेही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. एकच दागिना आता वेगवेगळ्या स्टाइल्समध्ये वापरता येईल. दिवसागणिक वाढती सोन्याची किंमत भारतीयांच्या मनातील सोन्यावरचे प्रेम कमी करू शकत नाही, हे खरं आहेच. पण, एकदा विकत घेतलेला दागिना जास्तीत जास्त कसा वापरता येईल हा प्रयत्न स्त्री करतच असते. कित्येकदा लग्नात केलेले दागिने इतके मोठे असतात, की ते छोट्या-छोट्या कार्यक्रमांना घालता येत नाहीत, तर कधी तेच तेच दागिने घालून कंटाळा येतो, मग ते मोडून नवीन दागिने करायचा घाट घातला जातो. ही गैरसोय टाळण्यासाठी डिझायनर्स एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने कसा वापरता येईल याचा विचार करू लागले आहेत. एका कलेक्शनमधील मुख्य नेकलेसपासून अलग करता येणार पेडंट एखाद्या चेनमध्ये घालून वेगळं घालता येऊ शकतं. त्यांच्याच 'प्लॅटर' कलेक्शनमध्ये वेगवेगळ्या रंगाच्या खड्यांचे पर्याय असलेली अंगठी देण्यात आली आहे. जेणेकरून एक अंगठी तीसहून अधिक पद्धतीने वापरता येते. तुमच्या ड्रेसला मॅच होणारी अंगठी यामुळे बदलता येते. गळ्यातील नाजूक हिऱ्यांची सर वेगळी केल्यास मांगटिका किंवा ब्रेसलेट म्हणून वापरता येईल. बाजूबंद किंवा अँकलेट म्हणून वापरता येणारा कडा असे प्रयोग यामध्ये केले जात आहेत. जेणेकरून दागिन्यांचा वापर वाढवता येणं शक्य होईल.

### स्टाइल आधुनिक, टच पारंपरिक...

तसं म्हणायला सोन्याच्या दागिन्यांच्या बाबतीतही स्त्रियांना पूर्वीपासून एखाद-दुसरी डिझाइन बघून भागायचं नाहीच. त्यांना पर्याय लागायचेच. त्यात पुरुषांप्रमाणे 'दुकानात जाऊन काही विकत न घेता बाहेर येणं विचित्र दिसतं', याबद्दल त्यांना फारसं कधीच काही वाटलं नाही. उलट जुन्याकाळी दागिन्यांचं गाठोडं घरी घेऊन येणाऱ्या सराफालासुद्धा 'माझ्या माहेरच्या सराफाच्या दागिन्यांची तोड नाही हो याला' हा टोमणा चुकत नसे. पण आजच्या घडीला केवळ फॅशन ज्वेलरी आणि इमिटेशन दागिन्यांइतकीच सोने, हिऱ्याची बाजारपेठ विस्तारू पाहात आहे. कारण आजची तरुणी सोन्याचे दागिने केवळ लग्नासाठी किंवा सणांसाठी वापरण्याऐवजी रोज वापरण्यास पसंती देऊ लागली आहे. अर्थात प्रत्येक मुलीसाठी तिचं 'लग्न' हा अजूनही तितकाच महत्त्वाचा मुद्दा आहे आणि त्यावेळी खास बनविल्या जाणाऱ्या दागिन्यांचे महत्त्वही तितकंच आहे. पण असं असताना हे दागिने लग्नानंतर कितीदा आणि किती वेगवेगळ्या प्रकारे वापरता येतील, याचं गणितसुद्धा ती करत असते. नेमकी हीच बाब डिझायनर्सनी अचूक हेरली आहे आणि त्यामुळेच तेही आता एकच दागिना वेगवेगळ्या पद्धतीने वापरता येईल अशा प्रकारचे डिझाइन्स बाजारात आणण्यास सुरुवात केली आहे. तसेच नेहमीच्या दागिन्यांच्या प्रकारांपेक्षा काही नवीन प्रकार आणण्याचे प्रयत्नही डिझायनर्सकडून करण्यात येत आहेत. पिवळं सोनं आणि सफेद हिरा यापलीकडे व्हाइट गोल्ड, रोज गोल्ड, अँटिक गोल्ड तसेच प्लॅटीनम वापरलं जाऊ लागलं आहे. कुंदन, जडावू तसेच गोल, चौकोन, त्रिकोणी, आयताकार किंवा ओव्हल अशा विविध आकाराचे, रंगांचे खडेसुद्धा सध्या दागिन्यांमध्ये वापरले जात आहेत. मीनाकारी नक्षी, जाळी डिझाइन सध्या ट्रेंडमध्ये आहे. मंदिरांवरचं नक्षीकाम तर डिझायनर्सना दिवसेंदिवस आकर्षित करत आहे. त्यामुळे पर्याय भरपूर वाढले आहेत. आधुनिक स्टाइलचे पण पारंपरिक टच असलेले प्रयोगशील दागिन्यांचा आनंद घेता येईल.

### बॉडी ज्वेलरी... नवा ट्रेंड

यंदाचा सर्वात वेगळा ज्वेलरी ट्रेंड पाहायला मिळाला तो म्हणजे 'बॉडी ज्वेलरी.' हा नवा ट्रेंड तरुणींमध्ये हळूहळू



रुजू लागलाय. एरवी खांद्यावरून रुळणारा पदर, दुपट्टा असं वर्णन केलं जायचं. पण आता हे वर्णन दागिन्यांबद्दल होण्यास सुरुवात झाली तर आश्चर्य वाटायला नको. नेकपीसला जोडून येणाऱ्या, खांद्यावरून हातावर रुळणाऱ्या मोत्यांच्या किंवा खड्यांच्या सरी, मनगटावरील कडा आणि बोटातील अंगठ्यांना जोडणारी हातफुलाची सर, कानातल्या डुलाच्या मागून हळूच केसांना भेटणाऱ्या बारीक सरी, मांगटिका किंवा हेडपीसला पदर, केसात डुलणाऱ्या बारीक सरी हे या पद्धतीच्या ज्वेलरीचे काही प्रकार आहेत. बेली नृत्य करणाऱ्या मुलींच्या ब्लाऊजला जोडलेल्या आणि पोटापर्यंत लोंबकळणाऱ्या माळा असतात. या नृत्याचा मुख्य फोकस नृत्यांगनांच्या पोटाकडे असल्यामुळे या नृत्य सादर करताना, त्या माळांमुळे प्रेक्षकांचे लक्ष वेधले जाते. मध्यंतरी गळा, हात फोकसमध्ये येतील अशा प्रकारे माळा लावलेले टॉप, कुर्ते बाजारात आले होते. आता ही जागा दागिन्यांनी घेतली आहे. अशा प्रकारच्या पदरीकरणाने त्या अवयवाचे सौंदर्य खुलते. सध्या इमिटेशन ज्वेलरीमध्ये या प्रकारांना असलेली मागणी पाहता सोन्याच्या दागिन्यांमध्येही हे प्रयोग करण्यात येत आहेत. अर्थात स्त्रियांना दागिन्यांबद्दल कुतूहल आणि प्रेम आहे, तोपर्यंत हे प्रयोग होत राहणार. त्यामुळे ही लखलखती दुनिया कायम तेवत राहणार, हे नक्की.

## शॉर्ट न्यूज

### जुन्या वादातून युवकावर तलवारीने हल्ला

**नेवासा :** तालुक्यातील अमळनेर येथे जुन्या वादाच्या कारणातून युवकावर तलवारीने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. पांडुरंग दत्तात्रय पवार, रा. वाटापूर हे मोरे वस्ती अमळनेर येथून जनावरांची औषधे आणण्यासाठी जात असताना दुचाकी व चारचाकी वाहनातून आलेले शरद निवृत्ती चोपडे, बंटी औटी दोघे रा. वाटापूर, प्रकाश थोरात व एक अनोळखी दोघे राहणार तमनर आखाडा ता. राहुरी यांनी फिर्यादी यास धक्का देत खाली पाडत शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली व लोखंडी पाइप, तलवारीने मारहाण करत जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

### वडाळा महादेवमध्ये बिबट्याने कुत्रे केले फस्त

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव येथील इरिगेशन कॉलनी पवार वस्ती येथे अनेक दिवसापासून बिबट्याचे वास्तव्य असून येथील माजी सरपंच अविनाश पवार यांच्या वस्तीवरील पाळीव कुत्रे घरासमोरूनच बिबट्याने उचलून नेत फस्त केले. पवार यांच्या वस्तीवरील पाळीव कुत्रे नेहमीप्रमाणे दरवाजासमोर बसले असताना बिबट्याने अचानक झडप घालून उचलून नेले. या घटनेने परिसरात घाबरटीचे वातावरण निर्माण झाले असून बिबट्यास जेरबंद करण्याची मागणी माजी सरपंच अविनाश पवार यांच्यासह स्थानिकांनी केली आहे.

### नेतृत्वगुण असलेला विद्यार्थी सर्वगुणसंपन्न

**प्रवरानगर :** नेतृत्वगुण असले तर विद्यार्थी सर्वगुणसंपन्न होत असतो. प्रवरेतून शिक्षणासोबत इतरही शालेय उपक्रमातून आदर्श विद्यार्थी घडत असतो. अभ्यासाबरोबरच शालेय जीवनाचे अनुभव घेत मुलांनी पुढे जावे, असे प्रतिपादन पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील रूरल मेडिकल कॉलेजचे प्राचार्य एअर व्हाईस मार्शल डॉ. राजवीर भालवार यांनी केले. प्रवरा सेंट्रल पब्लिक स्कुलच्या विद्यार्थी प्रतिनिधी पदग्रहण समारोहात ते बोलत होते.

### दानपेटी भरदिवसा फोडण्याचा प्रयत्न

**नवनागापूर :** येथील गजानन कॉलनीत असलेल्या विठ्ठल मंदिरात उचकापाचक करून दानपेटी फोडण्याचा प्रयत्न काल दुपारी १२. ३० वाजण्याच्या सुमारास घडला. चोरीचा प्रयत्न करणाऱ्या एका अल्पवयीन मुलाला स्थानिक नागरिकांनी पकडून एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. याबाबत ग्रामपंचायत कर्मचारी संदीप लाजरस पाटोळे (रा. नागापूर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### आश्वासनानंतर अरुण मुंडे यांचे उपोषण स्थगित

**शेवगाव :** नगर परिषदेच्या विरोधात भाजपचे प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांचे उपोषण दुसऱ्या दिवशी मागे घेण्यात आले. पाथर्डीचे प्रांताधिकारी प्रसाद मते व शेवगावचे तहसीलदार प्रशांत सांगडे यांनी अरुण मुंढे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून त्यांच्या सर्व मागण्या मान्य केल्याचे पत्र दिल्यानंतर प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्या हस्ते अरुण मुंढे यांनी जल ग्रहण करून हे उपोषण मागे घेतले.

### आमदार सत्यजित तांबे यांची पेढेतुला

**संगमनेर :** महाराष्ट्रातील तरुणांमध्ये असलेली नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार हे नाशिक पदवीधर मधून मोठ्या मताधिक्याने निवडून यावे यासाठी संगमनेर तालुक्यातील अकलापूर ग्रामस्थ व एनएसयुआय अध्यक्ष गौरव डोंगरे यांनी केलेल्या नवसाची पूर्तता झाल्याने काँग्रेस नेते आमदार बाळासाहेब थोरात यांच्या उपस्थितीमध्ये आमदार सत्यजित तांबे यांची पेढे तुला करण्यात आली. अकलापूर श्रीदत्त देवस्थान येथे आमदार सत्यजित तांबे यांचा पेढे तुला कार्यक्रम पार पडला. प्रसंगी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आता मी राहत्यामध्येच जाऊन बसणार!

**■ पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना खा. नीलेश लंके यांचे आव्हान ■ वाडेगव्हाण येथे सुपा गटाच्या वतीने नागरी सत्कार**

वाडेगव्हाण : प्रतिनिधी

**आता मी राहत्यामध्येच जाऊन बसणार आहे असे सांगत खा. नीलेश लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना शनिवारी वाडेगव्हाण येथून थेट आव्हान दिले. वाडेगव्हाणच्या मेळाव्यात बोलताना खा. लंके म्हणाले, कालच मी पवार साहेबांना सांगितलंय की राहत्याचा निर्णय लवकर घ्या आणि माझ्यावर जबाबदारी देऊन टाका. मी करतो काय करायचे ते. तुम्हाला साखरेत मळले, घोळले तरी तुमचे वाकडं ते वाकडंच. आमच्या शेपटावर पाय दिला तर मलाही नीलेश लंके म्हणतात असे सांगत लंके यांनी विधानसभेचे रणशिंग फुंकले.**

वाडेगव्हाण गटाच्या वतीने आयोजित नागरी सत्कारास उत्तर देताना खा. नीलेश लंके यांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे, मा. खा. डॉ. सुजय विखे यांच्यावर जोरदार शरसंधान केले.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, निवडणूक आयोगाकडे अर्ज करून मशिनची फेरतपासणी करण्यासाठी १८ लाख रूपये जमा करण्यात आले आहेत. तज्ञांच्या मते मतदान मशिनमध्ये काहीही फेरफार होणार नाही. असे झाले तर संपूर्ण देशातील निवडणूकीवर संशय घेतला जाईल. काल परवा उच्च न्यायालयात याचिकाही दाखल करण्यात आली आहे. अहो, तुमचे वडील असतील,आजोबा असतील इथे नीलेश लंके आहे.

म्हणूनच तुमची जिरवली. माझ्याकडे कारखाना नाही, शिक्षण संस्था नाही, बुध्दी आहे म्हणून तर जिरवली ना ? खरे तर आपण हरकत घ्यायला हवी होती. चोराच्या उलटया बोंबा यालाच म्हणतात. लोकांनी जिरवली तर आता आमच्या चुका झाल्या, आम्ही कमी पडलो, आता आपण सुधरून वागले पाहिजे. पण एखाद्याचं शेपट वाकडं ते वाकडंच असतं असे सांगत खा. लंके यांनी विखे पिता पुत्रांवर जोरदार टीका केली.

याप्रसंगी खा. लंके यांची वहया तुला करण्यात आली. यावेळी बाबाजी तरटे, अभिषेक कळमकर, दिलीप सातपुते, सुदाम पवार, प्रा.संजय लाकूडझोडे, सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे, सतीश भालेकर, सचिन पठारे,कारभारी पोटघन, प्रकाश गुंड, सरपंच प्रियंका यादव, उपसरपंच एकनाथ शेळके, सदस्य चौताली यादव यांच्यासह विविध गावांचे सरपंच, चेअरमन, सदस्य, नीलेश लंके प्रतिष्ठाणचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते.



■ लोकसभा निवडणूकीत ऐतिहासीक विजय संपादन केल्याबद्दल खा. नीलेश लंके यांचा सुपा जिल्हा परिषद गटाच्या वतीने वाडेगव्हाण येथे पार पडलेल्या कार्यक्रमात नागरी सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी लंके यांनी उपस्थितांशी संवाद साधला. (छाया : श्रीकांत चौरे)

### बाहेरच्या जबाबदारीमुळे तालुक्याकडे दुर्लक्ष

मताधिक्य कमी मिळाल्याने काही कार्यकर्त्यांनी खंत व्यक्त केली, मात्र माझ्या जीवाभावाच्या सहकाऱ्यांकडे मी बाहेरची जबाबदारी दिल्यामुळे गावाकडे, तालुक्याकडे दुर्लक्ष झाले. मात्र जे कार्यकर्ते सतर्क राहिले तिथे चांगले मताधिक्य मिळाले. जे हवेत राहिले तिथे कमी मताधिक्य मिळाले. राजकारणात सतर्क रहावे लागते. तुमच्या गावात तुम्ही कीती मताधिक्य दिले त्यावर तुमची योग्यता ठरते असे खा. लंके म्हणाले.

### सुपा गटाला काही कमी केले नाही

सुपा गटामध्ये आपण आपल्या राजकीय करीअरला सुरूवात केली. या गटामध्ये विकास कामांमध्ये कुठे कमी केले नाही. इतकेच काय तालुक्यातील प्रत्येक गावात काही ना काही विकास कामे देण्यात आली आहेत. विरोधी उमेदवारापेक्षा मी काय कमी केले ? प्रत्येक व्यक्तीला मी ओळखतो. प्रत्येकाच्या सुख, दुःखात मी सहभागी होतो. या गोष्टीही अभ्यासल्या पाहिजेत असे आवाहन खा. लंके यांनी यावेळी केले.

### मी दोनदा आलो, त्यांच्या पन्नास चकरा झाल्या !

अनेक जण सांगतात लोकसभेची निवडणूक जिंकणे अशक्य गोष्ट होती. मात्र आपण अशक्य ते शक्य करून दाखविले आहे. हे शक्य मी नव्हे तर तुम्ही करून दाखविले आहे. मी एक माध्यम आहे. मी सगळया ठिकाणी पोहचू शकत नाही. संपूर्ण लोकसभा निवडणूकीत मी फक्त दोन दिवस तालुक्यात आलो. त्या तुलनेत विरोधी उमेदवाराच्या व त्यांच्या कुटूंबातील सदस्यांच्या पन्नासच्यावर चकरा झाल्याचे खा. लंके म्हणाले.

### बारा नंतर स्टेट्स बदलणारे लक्षात आले !

महाविकास आघाडीचे सरकार पायउतार होईपर्यंत ३६५ दिवस आपल्या सोबत असलेले महायुतीचे सरकार आल्यानंतर विरोधकांच्या कळपात गेले. मी खासदार झाल्यानंतर पुन्हा आमच्याकडे येऊ पाहत आहे. खरं तर मी परमेश्वराला धन्यवाद देतो की मतमोजणीच्या दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत आपण मागे होते ते चांगले झाले. बारा वाजेपर्यंत विरोधकांचे स्टेटस ठेवलेले आपण मतमोजणीत पुढे गेल्यानंतर आपले स्टेटस ठेवणारे लक्षात आले. आपल्या कार्यालयात अशा लोकांच्या स्टेटसचे स्क्रिन शॉटही पहावयास मिळतील असेही लंके यांनी सांगितले.

### पारनेरकरांचे स्वप्न पुर्ण झाले

स्व. कॉ. बाबासाहेब ठुबे, स्व. स्वॉ. गुलाबराव शेळके यांनी संसदेत पारनेरच्या भुमिपुत्राने काम करावे हे स्वप्न पाहिले होते. ते स्वप्न आपण खा. नीलेश लंके यांच्या माध्यमातून पुर्ण केले आहे. तालुक्याच्या भुमिपुत्राने पाहिले पाऊल संसदेत पडले आहे.

**बाबासाहेब तरटे**
तालुकाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

### मोठया शक्तीला चितपट केले

समोर धनाढय, मोठी शक्ती असताना समोरून आवाज यायचा की हे शक्य नाही. समोरचे कुटूंब निवडणूकीत पराभूत होउ शकत नाही हे बोलले जात होते. जे शक्य नाही ते खा. नीलेश लंके यांनी करून दाखविले. मोठी राजकीय पार्श्वभुमी असलेल्या घराण्याला चितपट करण्याचे काम तुमच्या आमच्या सर्वांच्या साक्षीने झाले असल्याचे बाबाजी तरटे म्हणाले.

### आता विधानसभेचे रणशिंग फुंकायचे आहे

लोकसभा निवडणूकीत ज्या गावांमध्ये कमी मतदान झाले त्या गावांमध्ये येत्या विधानसभा निवडणूकीत आपण जास्तीत जास्त मतदान कसे घेउ याची काळजी घेतली पाहिजे. लवकरच पारनेर येथे एकत्रीत मेळावा घेउन विधानसभेचे रणशिंग फुंकायचे असल्याचे बाबाजी तरटे म्हणाले.

### वाचाळविरांना चोख उत्तर

या निवडणूकीत अतिशय खालच्या पातळीवर टीका टिपन्नी करण्यात आली. तालुक्यात वाचाळवीर निर्माण झाले होते. ज्यांची ग्रामपंचायत सदस्य होण्याची लायकी नाही अशांनी अतिशय खालच्या पातळीवर जाउन खा. लंके यांच्यावर टीका केली. या वाचाळविरांना मतदारांनी मतपेटीतून चोख उत्तर दिल्याचे बाबाजी तरटे म्हणाले.

### चाणाक्ष मावळयांनी निवडणूक सोपी केली

आपलीच निवडणूक म्हणून पारनेरकरांनी या निवडणूकीत भूमिका बजावत उत्तरेला झटका दिला. खा. लंके हे प्रचारादरम्यान भाषणे करीत त्याची धास्ती समोरच्या उमेदवाराने घेत ते वेळोवेळी चुका करत होते. खा. लंके व त्यांच्या प्रतिष्ठाणच्या चाणाक्ष मावळयांनी ही निवडणूक सोपी केली आणि विजय संपादन केला.

**अभिषेक कळमकर**
मा. महापौर, नगर

### तर तुमचा सातबारा वाचून दाखवू !

आतापर्यंत झालं ते झालं, इथून पुढे आमच्या नेत्यावर चिखलफेक करण्याचा प्रयत्न झाला तर तुमचा सातबारा वाचून दाखविण्याची आमच्यात धमक आहे. खा. लंके यांच्या विजयामुळे सुपा जिल्हा परिषद गटाचे भाग्य उजळले असून आपल्यासाठी हा सोनेरी क्षण आहे.

**सुवर्णा धाडगे, पुनम मुंगसे**

## अहिल्यानगर नावाला हायकोर्टात आव्हान;२५ जुलैला सुनावणी

नगर : प्रतिनिधी

**अहमदनगरचा नामांतराचा वाद आता न्यायालयात गेला आहे. अहमदनगरचे नामांतर अहिल्यानगर करण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात औरंगाबाद खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. २५ जुलैला याबाबत सुनावणी होणार आहे.**




नामांतराचा ठराव नियमानुसार झालेला नाही, यासाठी केंद्र सरकारने ठरवून दिलेल्या निकषांचे पालन होत नाही, यासह इतर विविध मुद्द्यांकडे लक्ष वेधत हा निर्णय रद्द करावा, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे. माजी कुलगुरू सर्जेराव निमसे, आर्किटेक्ट अर्शद शेख व पुष्कर सोहोनी यांनी ही खंडपीठात याचिका दाखल केली आहे. न्यायमूर्ती रवींद्र घुगे व वाय. डी. खोब्रागडे यांच्यासमोर ही याचिका आहे. यामध्ये केंद्र सरकार, राज्य सरकार, नाशिक विभागीय आयुक्त आणि अहमदनगर महापालिका आयुक्त यांना प्रतिवादी करण्यात आले आहे.

प्रशासकीय पातळीवर अद्यापही अहमदनगर हेच नाव वापरात आहे. आता लवकरच विधानसभा निवडणूक येणार आहे. त्यापूर्वी केंद्र सरकारकडून नामांतर प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी राज्य सरकारकडून पाठपुरावा सुरू आहे. तर दुसरीकडे उच्च न्यायालयात याविरोधात जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. यावर न्यायालय काय निर्णय घेणार, हे सुनावणीनंतरच स्पष्ट होणार आहे.

(पान १ वरून)

### आझाद ठुबे यांना अटक

असताना आझाद हा कान्हूरपठार येथे घरी असल्याचे समजल्यानंतर पोलीस निरीक्षक समिर बारवकर यांनी पोलीस पथकासह रविवारी रात्री साडेअकरा वाजता पारनेर रस्त्यावरील आझाद याच्या निवासस्थानावरून त्यास अटक केली. ठुबे यास अटक करण्यात आली त्यावेळी त्यांच्या पत्नी या देखील निवासस्थानी होत्या अशी माहितीही पुढे आली आहे. यासंदर्भातील माहीती अशी की, या प्रकरणातील तक्रारदारांना रणजित पाचर्णे याने दि.२०२१ मध्ये २ कोटी रूपये ४टक्के व्याजाने दिले होते. त्या अनुषंगाने राजे शिवाजी पतसंस्थेमध्ये शिवाजी रिकामे व इतर ११ जणांची कर्जप्रकरणे करून घेण्यात आली होती. या कर्जप्रकरणासाठी देण्यात आलेल्या धनादेशाचा गैरवापर करून फसवणूक केल्याप्रकरणी आझाद ठुबे व इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. आझाद ठुबे यास अटक झाल्याने तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2
डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ
● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)
● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार
● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार
● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया
सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)
पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
नोंदणी क्र. महा. ३९६/२२
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच
मेजर भगवान नांगरे सर
✲ आमची वैशिष्ट्ये ✲
✲ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✲ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✲ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✲ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✲ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✲ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✲ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✲ ॲडमिशन ओपन ✲
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# पाच मिनिटे तरी मानवी मुल्यांचे मार्गदर्शन करा

## डॉ. अमित शेष यांचे प्राध्यापकांना आवाहन



वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या बी फार्मसी या पदवी अभ्यासक्रमाची विद्यापीठ संलग्निकरण तपासणी नुकतीच पार पडली.

**निघोज : प्रतिनिधी**

**प्राध्यापकांनी शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना दररोज पाच मिनिटे तरी मानवी मुल्यांवर मार्गदर्शन करावे असे आवाहन डॉ. अमित शेष यांनी केले.**

निघोज येथील सहकार महर्षी किसनराव वराळ पाटील कॉलेज ऑफ फार्मसीच्या बी फार्मसी या पदवी अभ्यासक्रमाचे सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठीची विद्यापीठ संलग्निकरण तपासणी नुकतीच पार पडली. त्यावेळी डॉ. अमित शेष यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी संलग्निकरण कमिटीचे चेअरमन डॉ. अमित शेष यांच्यासह लोनेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे प्रतिनिधी डॉ. सत्यवान धोंडगे आदी उपस्थित होते. विद्यापीठ संलग्निकरणासाठी आवश्यक असलेले सर्व निकष पुर्ण केल्याबद्दल कमिटी सदस्यांनी संस्थेचे कौतुक केले.

यावेळी बोलताना डॉ. अमित शेष म्हणाले, सध्या मानवी मुल्यांचा -हास होत असून ही मुल्ये टिकवून ठेवण्याची जबाबदारी शिक्षकांचीच आहे. जीवन सुखमय होण्यासाठी अनेक वर्षांपासून विचारवंतांनी मानवी मुल्यांची जोपासना केली आहे. जितकी नितिमत्ता किंवा मानवी मुल्ये अधिक तेवढा समाज सुदृढ आणि संपन्न होतो. मंदिरे, शाळा, महाविद्यालये आदी ही मुल्ये टिकविण्याची तसेच शिकविण्याची केंद्र असल्याचे डॉ. शेष म्हणाले. वराळ फार्मसी कॉलेज हे निघोजसारख्या ग्रामीण भागात असणारे एकमेव औषण निर्माण क्षेत्रात शिक्षण देणारे कॉलेज आहे. यावेळी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कुलदीप वैद्य, उपप्राचार्य शिफा शिकलगर यांचे विशेष सहकार्य लाभल्याचे डॉ. शेष म्हणाले.

फार्मसी विभागाची विद्यापीठ संलग्निकरण तपासणी यशस्वी पार पाडल्याबददल संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ वराळ पाटील, संस्थेचे सचिव विराज रंगनाथ वराळ पाटील यांनी कॉलेजचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानले.

# पठारवाडीतील सहाशे एकर सरकारी जमीन हडपण्याचा डाव

## वाद न्यायालयात, ग्रामस्थ आक्रमक

**पठारवाडी : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील येथील सरकारी सहाशे एकर जमीन हडपण्याचा गावातील काहींचा डाव असल्याचा आरोप करत, ग्रामस्थांनी या प्रश्नावर ग्रामसभा घेतली. पठारवाडी येथील अनिल उमाजी सुपेकर व इतर बारा जणांनी पठारवाडी गावातील सहाशे सतरा एकर सरकारी जमिनीवर मालकी हक्क सांगणारा दावा अहमदनगर येथील दिवाणी न्यायालयात दाखल केला आहे.**



त्यांचे पूर्वज या जमिनीवर वहिवाट करत होते असा दावा त्यांनी केला आहे. सध्या ही जमीन महाराष्ट्र शासनाचे ताब्यात असून सरकार असे नाव आहे. हि संपुर्ण जमीन डोंगर आहे. येथील या जमिनीवर गावातील नागरिकांना गुरे चारण्याचा हक्क राखून ठेवण्यात आलेला आहे. पठारवाडी ग्रामपंचायत यांचे अस्तित्वाअगोदर ही जमीन निघोज ग्रुप ग्रामपंचायत यांच्या हद्दीत होती. तशा नोंदी देखील आढळून येतात.

निघोज हे संपूर्ण गाव भोरचे संस्थानिक शंकरराव चिमाजी पंतसचिव यांना सन २४ जून १९०१ रोजी एका लिखित सनदेने ब्रिटिशांनी जात इनाम म्हणून दिले होते. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९५२ ला जात इनाम रद्द करण्याचा कायदा झाला. व हे इनाम रद्द करण्यात आले. त्यानंतर या जमिनीवर महाराष्ट्र शासन असे नाव लागले. तेव्हापासून आजपर्यंत ही जमीन महाराष्ट्र शासनाच्या नावाने असून त्यांच्या ताब्यात आहे.

या जमिनीवर दावा करणारांनी त्यांचे पूर्वज संस्थानिक पंतसचिव यांच्याकडे नोकर होते व ते सदर जमिनीत पिके घेऊन उदरनिर्वाह करत होते. असा दावा करत मालकी हक्क सांगितलेला आहे. त्यांच्या या दाव्याला पठारवाडी ग्रामस्थांनी तीव्र आक्षेप घेवुन विरोध केला आहे. ही सरकारी जमीन असून गावातील मालकी सांगणारे यांचा या जमिनीशी काहीही संबंध नाही. ही जमीन शासनाची आहे, तीची मालकी शासनाकडेच राहावी तेथील वापर गावची गुरे चरण्या करता यावा.असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला. तसेच त्या जमिनीबाबत न्यायालयात दाखल केलेल्या दाव्यात हस्तक्षेप अर्ज दाखल करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला. या ग्रामसभेला मोठ्या संख्येने ग्रामस्थ,ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक हजर होते.

# नारायणगव्हाण मध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

## भेटवस्तू देऊन केली कृतज्ञता व्यक्त



**सुपा : प्रतिनिधी**

**समप्रभा शिक्षण संस्था संचलित ब्लुमिंग बड्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज नारायणगव्हाण येथे गुरुपौर्णिमा उत्सव थाटात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँक ऑफ महाराष्ट्राच्या बँक मॅनेजर शैला गायकवाड मॅडम यांनी शाळेच्या सर्व शिक्षकांना मार्गदर्शन करून बँक ऑफ महाराष्ट्राच्या वतीने गुरुजनांना ग्रुप पॉलिसी प्रदान केली. तसेच संकेत बेलसरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून बँकिंग विषयाची माहिती दिली. व सर्व गुरुजनांना गुरुपौर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या.**

यावेळी विद्यार्थ्यांनी गुरु विषयक आदर व्यक्त करण्यासाठी भाषणे, डान्स विविध कला प्रदर्शन केले. मान्यवरांच्या हस्ते शिक्षकांना संस्थेच्या वतीने गुलाब पुष्प व भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त केली. तसेच मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे प्राचार्य धनंजय नाईक सरांनी केले. सूत्रसंचालन जया शेळके यांनी केले तर नीलम शेळके, जया खेमनर, रूपाली शेळके, आढाव पुनम आदी शिक्षकांचे सहकार्य लाभले. प्रीतीलता हांडे यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# निघोजला आषाढ पौर्णिमेचे उद्घाटन

## वर्षा वास प्रवचन मालिका समारंभ संपन्न



**निघोज : प्रतिनिधी**

वर्षावासाचा नियोजनाप्रमाणे सकाळचा सत्रात प्रत्येक गावात धम्माचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने रविवार २१ रोजी सकाळच्या सत्रात भारतीय बौद्ध महासभा पारनेर तालुका अंतर्गत निघोज ग्राम शाखा व आंबेडकर स्मृती संघ मुंबई निघोज यांचा संयुक्त विद्यमाने त्रिरत्न बुद्ध विहार याठिकाणी आषाढ पौर्णिमा व वर्षावास प्रवचन मालिकेचं उद्घाटन करण्यात आले.

यावेळी झेंडावंदन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष आंबेडकर स्मृती संघाचे अध्यक्ष सुभाष सोनावणे होते. यावेळी बाळासाहेब सोनावणे, हिराभाऊ सोनावणे, बबन सोनावणे, शांताराम सोनावणे, अमित सोनावणे, प्रकाश सोनावणे, संजय सोनावणे, रमेश सोनावणे,कल्पना सोनावणे, शेवबाई जावळे, रंजना सोनावणे, आदी उपासक उपस्थित होते.

सुभाष सोनवणे यांनी आषाढ पौर्णिमा आणि वर्षावसाचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले यावेळी ते म्हणाले गेली अनेक वर्षांपासून निघोज परिसरात आषाढ पौर्णिमा निमित्ताने वर्षावास हा कार्यक्रम संपन्न होत असतो यानिमित्ताने सर्व समाजबांधव एकत्र येत आषाढ पौर्णिमा उत्साहात साजरी करीत असतात.

भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी हिरामण सोनावणे, व सुभाष सोनावणे यांनी उपस्थित सर्वांना पोर्णिमेचा शुभेच्छा व मार्गदर्शन केले. आंबेडकर स्मृती संघ मुंबई निघोज सर्व पदाधिकारी व सर्व उपासकांचा मदतीने कार्यक्रम मंगलमय वातावरणात आनंदात संपन्न झाला.

भारतीय बौद्ध महासभेचे पारनेर तालुका अध्यक्ष बाबाजी वाघमारे यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तसेच त्यांनी प्रास्ताविक करताना या कार्यक्रमाची सविस्तर माहिती दिली. यावेळी आंबेडकर स्मृती संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दगडू सुपेकर यांचे कार्य समाजाभिमुख

## दिपक आण्णा लंके यांचे प्रतिपादन



**निघोज : प्रतिनिधी**

**पठारवाडी परिसराच्या विकासासाठी तसेच सामाजिक कामासाठी दगडू सुपेकर यांनी मोठे योगदान दिले असल्याचे प्रतिपादन दिपक आण्णा लंके यांनी व्यक्त केले आहे. दगडू नाना सुपेकर यांच्या प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रमात ते आदरांजली वाहताना बोलत होते.**

दिपक आण्णा लंके यावेळी म्हणाले ग्रामपंचायत सदस्य दौलतराव सुपेकर व प्रगतीशील शेतकरी संतोष सुपेकर यांनी वडीलांच्या कार्याचे अनुकरण करीत पठारवाडी येथील विकासासाठी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिले असून सामाजिक कामांत मोठे योगदान दिले आहे. खासदार नीलेशजी लंके यांच्या माध्यमातून पठारवाडी परिसरात मोठ्या प्रमाणात विकासकामे होणार असून निघोज जवळा तसेच पठारवाडी ग्रामस्थ सातत्याने खासदार लंके यांना साथ देत आहेत. दगडू नाना सुपेकर यांचे कार्य समाजाभिमुख असल्याने ही जनता त्यांना कदापी विसरणार नाही असे प्रतिपादन लंके यांनी व्यक्त केले आहे.

यावेळी नरहरी महाराज सांगळे यांचे किर्तन झाले ते म्हणाले आई वडीलांची चांगल्या प्रकारे सेवा करीत प्रगतीशील शेतकरी संतोष सुपेकर व ग्रामपंचायत सदस्य दौलतराव सुपेकर यांनी तसेच कुटुंबाने चांगला सेवाभाव केला आहे.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती काशिनाथ दाते, बाबासाहेब कवाद निघोज नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष वसंत कवाद, माजी सरपंच भास्करराव सुपेकर, माजी उपसभापती बबुशा वरखडे, संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुका अध्यक्ष सचिन वराळ पाटील, माजी सभापती सुदाम पवार, शिवसेना तालुकाप्रमुख डॉ श्रीकांत पठारे, राष्ट्रवादी युवा नेते जितेश सरडे, जिल्हा परिषद माजी सदस्य राजाराम एरंडे, आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष रुपेश ढवण, माजी सरपंच ठकाराम लंके, रामचंद्र महाराज सुपेकर यांनी आदरांजली अर्पण केली. बाजार समीतीचे संचालक किसनराव सुपेकर यांच्या हस्ते यावेळी सांगळे महाराज यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी निघोज, जवळा तसेच शिरुर व पारनेर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामपंचायत सदस्य दौलतराव सुपेकर यांनी या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले शेवटी प्रगतीशील शेतकरी संतोष सुपेकर यांनी आभार मानले.

# राहुल रसाळ शेतीमध्ये क्रांती करणारा आदर्श

## प्राचार्य डॉ.सहदेव आहेर यांचे गौरवोद्गार

**निघोज : प्रतिनिधी**

**आजची युवा पिढी शेतीकडे आकर्षित झाली पाहिजे यासाठी प्रगतीशील शेतकरी राहुल रसाळ यांचे दहा वर्षांतील योगदान फार मोठे असून राज्य सरकारने वेळोवेळी दखल घेऊन रसाळ यांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याची दखल घेऊन शासनाने चांगली भूमिका घेतली असल्याचे प्रतिपादन मुलिकादेवी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी व्यक्त केले आहे.**

मुलिकादेवी महाविद्यालय निघोज येथे आदर्श शेतकरी राहुल रसाळ यांना महाराष्ट्र शासनाने २०२४ चा वसंतराव नाईक नाविन्यपूर्ण शेतकरी पुरस्कार दिला आहे याबद्दल महाविद्यालय वतीने रसाळ यांचा सत्कार करण्यात आला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सहदेव आहेर होते.

यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रगतीशील शेतकरी राहुल रसाळ म्हणाले की,आधुनिक जगात शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे.जिवनाश्यक बाबीचा निर्माता हा शेतकरी आहे म्हणून शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हटले जाते .भारत हा शेती प्रधान देश असून शेती सहाय्याने आपल्याला क्रांती करता येते, त्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरून रासायनिक शेती आपण चांगल्या प्रकारे करू शकतो असे सांगितले.



माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक नाविन्यपूर्ण आदर्श शेतकरी पुरस्कार मिळाल्याबद्दल निघोज येथील मुलिका देवी महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ सहदेव आहेर यांच्या हस्ते प्रगतीशील शेतकरी राहुल रसाळ यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. प्रविण जाधव, डॉ. दुर्गा रायकर, डॉ. पोपट पठारे, डॉ. गोविंद देशमुख, प्रा. मनीषा गाडीलकर, प्रा. संगीता मांडगे, प्रा. आनंद पाटेकर, प्रा. स्वाती मोरे, प्रा. सचिन निघूट, प्रा. नीलिमा घुले, प्रा. रुपाली गोरडे, प्रा. पूनम गंधाक्ते, प्रा. नूतन गायकवाड, प्रा. वृषाली जगदाळे, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. अश्विनी सुपेकर, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. नम्रता थोरात, प्रा. अशोक कवडे, प्रा. अक्षय अडसूळ, प्रा. संदीप लंके, श्री. नवनाथ घोगरे, श्री. अक्षय घेमुड, श्री. किशोर बाबर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आनंद पाटेकर यांनी केले तर आभार डॉ. मनोहर एरंडे यांनी मांडले.

# रामदास कवडे यांना ध्येय गौरव पुरस्कार प्रदान

## शैक्षणिक , सामाजिक कार्याची दखल

**नगर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील पाबळ कवडे वस्ती येथील माजी रयत सेवक- निवृत्त कलाशिक्षक रामदास गणपत कवडे सर यांना ध्येय उद्योग समूहाच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रात दिलेल्या बहुमोल योगदानाबद्दल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व लखनऊचे माजी कुलगुरू डॉ.सर्जेराव निमसे यांच्या हस्ते अहिल्यानगर येथे ध्येय गौरव पुरस्कार प्रदान करून गौरवण्यात आले.**

यावेळी युवा उद्योजक नितीन एडके,युवा ध्येय अध्यक्ष लहानु सदगीर, लोणीमावळा सोसायटीचे मा.चेअरमन कैलास गोरडे ,चित्रकार ज्ञानेश्वर कवडे आदी मान्यवर उपस्थित होते. रयत शिक्षण संस्थेमध्ये विविध शाळांमध्ये कला अध्यापनाबरोबरच शालेय परिसरात सुशोभीकरण ,बोलक्या भिंती प्रकल्प , वृक्ष लागवड संगोपन संवर्धन करण्यासाठी सातत्याने पुढाकार होता.निवृत्त झाल्यानंतरही पारनेर तालुक्यातील शाळा परिसर तसेच रस्ते वाडया वस्त्यांवर वृक्ष



लागवड करून पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न करत आहेत.

निवृत्तीनंतरही अहिल्यानगर व पुणे जिल्हा परिसरातील ५०० च्या वर शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी हस्ताक्षर सुधार प्रकल्प राबविला आहे .कवडे वस्ती येथील चाळीस वर्षांपूर्वी श्री दत्त मंदिर व विठ्ठल मंदिर उभारणी चे संकल्पक म्हणून सर्वांना बरोबर घेत लोक सहभागातून धार्मिक कार्यातही मोठे योगदान आहे .

विविध क्षेत्रातील त्यांच्या बहुमोल कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. शिवव्याख्याते प्रा ज्ञानेश्वर कवाद, पारनेर तालुका पत्रकार संघाचे उपाध्यक्ष व उपकार्याध्यक्ष भास्करराव कवाद, व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी मोहनशेठ कवाद, प्रा. डोके, शिवबा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अनिल शेटे, अध्यक्ष बबनराव तनपुरे, पदाधिकारी राजूशेठ लाळगे आदिंनी अभिनंदन केले आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com